**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्यात येणा-या कामांसाठी अनुज्ञेय यंत्राचा वापर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

नियोजन (रोहयो) विभाग

शासन परिपत्रक क्र. : मग्रारो-२०१४/प्र.क्र.७३/मग्रारो-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक :- ०९ जून, २०१६

**संदर्भ :**

१) केंद्र शासन, ग्रामीण विकास विभाग, नवी दिल्ली यांचे क्र.११०११/०९/२०१४-RE-I(३३७०८८) दिनांक २५ ऑगस्ट, २०१४ चे पत्र

२) आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर यांचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ चे पत्र

३) शासनाचे समक्रमांकाचे पत्र, दिनांक १९ जानेवारी, २०१५

४) केंद्र शासनाचे सन २०१६-१७ चे Master Circular.

**प्रस्तावना-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचनांनुसार योजना राज्यात राबविली जाते. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (०६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूची २ मधील परिच्छेद २१ अनुसार व्यवहार्य असेल तेथवर, कार्यक्रम अंमलबजावणी अभिकरणांकडून केली जाणारी कामे ही, शारीरिक श्रमाचा वापर करुन पार पाडता येतील आणि मजूरांऐवजी कोणत्याही यंत्राचा वापर केला जाणार नाही, अशी तरतूद आहे. सदर तरतूद रोजगार पुरविणे या कायद्यातील मूलभूत उदिष्टाचे संरक्षण करते.

२. उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये महात्मा गांधी नरेगा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांसाठी यंत्राचा वापर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, या योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांसाठी यंत्राच्या वापराबाबत क्षेत्रीय यंत्रणेमध्ये संभ्रम असल्याचे निदर्शनास आले आहे.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणारी काही कामे ही त्यांच्या स्वरुपामुळे व लागणाऱ्या वेळेमुळे मजुरांमार्फत करता न येण्यासारखी आहेत. अशा कामांची गुणवत्ता व टिकाऊपणा कायम ठेवण्यासाठी यंत्राचा वापर करणे अनुज्ञेय आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या Master Circular मध्ये कामाच्या प्रकारानुसार अनुज्ञेय यंत्राच्या वापराबाबत तपशील देण्यात आला आहे. अशा कामांचे नाव, कामाचा प्रकार व अनुज्ञेय यंत्र याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा प्रकार | अनुज्ञेय यंत्र |
|---|---|---|---|
| १. | जमिनीची उत्पादनक्षमता सुधारणे व विहीर खोदणे | खोदकाम / विहिरीचे खोदकाम | अ) पाणी उपसण्यासाठी पंपसेट<br>ब) खडकाळ भागासाठी ट्रॅक्टर माऊन्टेड कॉम्प्रेसर हॅमर<br>क) लिफ्टिंग उपकरण/ चैन पुली (मोटोराईज्ड) |
| २. | रस्ता | I) १५ ते २३ से. मी. जाडीच्या मातीच्या थराचे दृढीकरण. | अ) पॉवर रोलर<br>ब) ट्रेलर माऊन्टेड वॉटर ब्राऊसर |
| | | II) १५ ते २० से. मी. मुरुम / ग्रॅव्हलचे पक्कीकरण आणि इष्टतम ओलावा असलेल्या थरातील ग्रॅव्हलचे दृढीकरण. | अ) ८-२० टन वजनाचे स्टॅटिक स्मूथ व्हील्ड रोलर<br>ब) ट्रेलर माऊन्टेड वॉटर ब्राऊसर |
| | | III) सिमेंट कॉन्क्रिटचे मिश्रण करणे. | अ) मेकॅनिकल मिक्सर |
| | | IV) सिमेंट कॉन्क्रिटचे दृढीकरण. | अ) मेकॅनिकल व्हायब्रेटर. |
| | | V) सिमेंट कॉन्क्रिटच्या जोडाची कापणी करणे. | अ) कॉन्क्रिट जॉईंट कटर. |
| ३. | इमारत बांधकाम | I) आरसीसी फुटिंग, कॉलम बीम व रुफ | अ) मेकॅनिकल मिक्सर आणि मेकॅनिकल व्हायब्रेटर. |
| ४. | इमारतीसाठी बांधकाम साहित्याचे उत्पादन | १) कॉम्प्रेसिंग कॉम्प्रेस्ड अर्दन ब्लॉक्स ( CSEB) | अ) CSEB साठी मशिन्स, जसे ऑरम प्रेस, सिनॅव्हरम, टेरस्तरा, मर्दिनी, तारा-बलराम इ. |
| | | २) वीटा/ब्लॉक्स यांचे उत्पादनासाठी | अ) पॅन मिक्सर व वीटा/ ब्लॉक बनविण्यासाठी मशीन्स (व्हायब्रेटरी टेबल/हायड्रॉलिक प्रेस) |
| ५. | सामुहिक व वन जमिनीवर वनीकरण, वृक्ष लागवड | उपयोगी क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी मनुष्यबळाकडून खड्डे खोदणे शक्य होत नाही, तसेच कंकर पॅन व पीएच ८.५ पेक्षा जास्त अशा अल्कधर्मी जमिनीमध्ये लागवडीसाठी खड्डे खोदकाम | अ) मेकॅनिकल ऑगर |

४. वर उल्लेख केलेल्या यंत्राचा वापर करताना खालील अटींचे पालन करणे बंधनकारक आहे.-

१) महात्मा गांधी नरेगा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये संबंधित यंत्रणेच्या प्रचलित दरसूचीनुसार यंत्र वापराचा दर समाविष्ट केलेला असावा.

२) यंत्राचा वापर करुन केलेल्या कामांचे सामाजिक अंकेक्षण संचालनालयाच्या कॅलेंडरमध्ये समावेश करुन सामाजिक अंकेक्षण करुन घ्यावे. यंत्राचा वापर व त्याचा अंदाजित खर्च तसेच यंत्र कोणत्या उद्देशासाठी वापरले आहे याचा सविस्तर तपशील कामाच्या ठिकाणावरील फलकावर मराठीमध्ये नोंदविणे अनिवार्य आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१६०६०९१५०८४७६११६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**आपला,**

**( डॉ.प्रमोद शिंदे )**
**उप सचिव (रोहयो) नियोजन विभाग**

प्रत :-

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (रोहयो)यांचे खाजगी सचिव
सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
आयुक्त (कृषी), कृषि आयुक्तालय, पुणे
सर्व, विभागीय आयुक्त
आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई
आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
संचालक, फलोत्पादन, पुणे
संचालक, भुजल विकास यंत्रणा विकास, पुणे
सर्व जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

सर्व गट विकास अधिकारी

कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

(महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)

सारसंग्रह रोहयो – १ / निवडनस्ती (रोहयो.१)